# वसई विरार शहर महानगरपालिका
## विद्युत विभाग, प्रभाग समिती 'सी'
## निविदा सुचना क्र. ०७(२०२४ - २०२५)

वसई-विरार शहर महानगरपालिका विद्युत विभागाकडील खालील कामाकरीता शासनाचे विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडुन **बी-२ नमुन्यात दोन लखोटा** पध्दतीनुसार महानगरपालिकच्या अटी व शर्तीस अधीन राहून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. ०५ / ०३ / २०२५ पासुन ते दि. १३/ ०३ / २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत महापालिकेच्या कार्यालयीन कामकाजाचे वेळी रोखीने विकत मिळतील. सदर कामाची इसारा रक्कम आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट लखोटा क्र. १ सोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा न भरलेल्या , खाडाखोड करुन स्वाक्षांकित न केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सर्शत निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पुर्णपणे भरलेल्या मोहरबंद निविदा दि. ०५/ ०३ / २०२५ पासून ते दि. १३/ ०३ / २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यत महानगरपालिका विद्युत विभाग, प्रभाग समिती 'सी' येथे स्विकरण्यात येतील. प्राप्त निविदा सहा. आयुक्त यांच्या दालनात हजर निविदाधारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष शक्यतो त्याच दिवशी दुपारी ४:०१ वा.अथवा इतर सोयीच्या दिवशी उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अदांजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रूपये | निविदा फॉम फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील श्री जीवदानी देवी रुग्णालय येथील उद्वाहक (लिफ्ट) क्र. १ व २ ची ३ (तीन) वर्षाकरिता त्रैवार्षिक साहित्यासह देखभाल दुरुस्ती करणे | ५,००,०००/- | रु. ५,०००/- | रू.५००/- +१८% GST<br>५९०/- | २ % डि.डि. ने व<br>२ % देयकातुन | ३ वर्ष<br>(३६ महिने) |

## अटी-शर्ती

१) कोरे निविदा फॉर्म खरेदीची अंतिम दि. १३ / ०३ /२०२५ रोजी पर्यंत राहील.

२) ठेकेदाराने निविदा भरताना गुडस् ऍण्ड सर्विस टॅक्स (GST) चा विचार करुन निविदा दर भरावे. तसेच शासनाने वेळोवेळी लागू केलेले दर किंवा दर करार शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे सर्व समावेश करुन भरण्यात यावे.

३) ठेकेदारांनी निविदा भरताना दोन लिफाफा पद्धतीचा अवलंब करावा.

४) लिफाफा क्र.०१ मध्ये खालील कागदपत्रांच्या छायांकीत प्रतींचा समावेश असणे आवश्यक आहे.
**१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे कडील उद्वाहन देखभाल दुरुस्ती कामाच्या परवानाची छायांकीत प्रत. २) १०० रु.स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-अ) ३) ५००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर घोषणापत्र (परिशिष्ट-ब) ४) इसारा रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट ५) गुडस् ऍण्ड सर्विस टॅक्स (GST) नोंदणी छायांकीत प्रत.**

५) निविदेतील लिफाफा क्र.०१ मध्ये तसेच निविदा मंजूरी व देयक अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहील. सार्वजनिक बांधकामाचे अधिकारी त्यास जबाबदार असणार नाही. सदरची कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये नसल्यास संबंधित निविदाधारकास अपात्र ठरविण्यांत येईल व फक्त पात्र निविदाधारकांच्या स्पर्धात्मक निविदा बोलीचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

६) कंत्राटदारानी द्वितीय लखोटयामध्ये बी - २ नमुन्यात दर भरण्यात यावे.

७) लिफाफा क. १ मधील कागदपत्रांची पुर्तता घेऊन ज्या कंत्राटदाराचे लिफाफा क्र. २ मधील देकार उघडण्यात येतील अशा निविदाकाराचे धनाकर्ष लिफाफे वगळता इतर कंत्राटदारांचे धनाकर्ष लिफाफे ७ दिवसात परत करण्यात येतील.

८) निम्नतम निविदाकारांना कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३ दिवसांत इतर निम्नतम निविदाकाराचा धनाकर्ष परत करण्यात येईल.

९) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे / धनाकर्ष सादर करणाऱ्या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल व संबंधित कंत्राटदाराला काळया यादीत सामाविष्ट करण्यात येईल. यासंबंधी मा.आयुक्त / मा.अति.आयुक्त / मा.उप-आयुक्त (विद्युत) यांना पुर्ण अधिकार राहतील.

१०) पुरवठा दाराने निविदा पत्रात मालाचे/साहित्याचे दर विहित केलेल्या रकान्यात स्पष्ट अंकात व अक्षरात खाडाखोड न करता लिहावेत. खाडाखोड झाल्यास त्याजागी निविदाकाराने स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील.

११) निविदा कामाबाबत तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास फेरनिविदा मागविण्याचा तसेच कोणत्याही कारणाशिवाय निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

१२) निविदाधारकास शासनाकडुन भविष्यात होणारी करा संबधी वाढ/घट लागु राहिल.

१३) निविदेमध्ये नमुद केल्याप्रमाणे वार्षिक परिमाण (Approx, Annual Required Quantity) हे अंदाजित असून त्यामध्ये वाढ/ घट होऊ शकते. त्याबाबत कुठलाही दावा करता येणार नाही.

१४) निविदा कालावधीत बाजारभावात वाढ झाल्यास निविदेत दिलेल्या मंजूर दरानेच काम करणे बंधनकारक राहिल.

१५) धनाकर्ष उपलब्ध करुन देणे /धनाकर्ष परत करणे व इतर बाबींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाहि करावी.

a) धनाकर्ष /बँक प्रतिपुर्ती हमी आयुक्त , वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नावे असाव्या.
b) धनाकर्ष/बँक प्रतिपुर्ती हमीची मुदत कामाच्या दोष दायीत्व कालावधीनंतर एक महिना कालावधी पर्यंत असावी.
c) धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ३ महिने पर्यंत असावी.
d) धनाकर्षावर बँकेचाMICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.

१६) निविदा मंजूर झाल्यानंतर मजूंर ठेकेदाराने अंदाजित खर्चाचा २% महानगरपालिकेकडे डिमांड ड्राफ्ट अथवा रोख भरणा करुन करारपत्र करावयाचे आहे व २% सुरक्षा अनामत रक्कम देयकातुन वेळोवेळी कपात करण्यात येईल .

१७) निविदेसोबत भरलेली सुरक्षा अनामत रक्कम ठेका संपुष्टात / दोष दायीत्त्व कालावधी संपल्यानंतर आपल्या लेखी मागणीनुसार ६ महिन्यांचा कालावधीनंतर परत करण्यात येईल.

१८) निविदेसोबत भरलेल्या अनामत रक्कमेवर कोणत्याही स्वरुपात व्याज दिले जाणार नाही.

१९) ठेकेदाराने निविदेत भरलेले कमीत कमी दराप्रमा उत्कृष्ट दर्जाचे काम करुन देणे बंधनकारक राहिल.

२०) निविदावावत काही शंका असल्यास माहितीसाठी विद्युत विभाग, प्रभाग समिती 'सी' येथे संपर्क साधावा.

२१) मुदतीत प्राप्त झालेली निविदा दि. १३ / ०३ /२०२५ रोजी दु.४:०१ वाजता अथवा इतर सोयीच्या दिवशी उघडण्यात येईल.

२२) कोणतीही एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त,वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

जावक क्र. : वविशम /प्रससी / विवि / ७०४ / २४-२५
दिनांक : ०५/ ०३ /२०२५

(नानीसाहेब कामठे)
उप-आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका